# MT- 162

**Seat No.** | | | | | | | |

**2014 .... .... 1100**

**MT - 162 - MARATHI (SECOND OR THIRD LANGUAGE) (M) - PRELIM II - PAPER - IV**

**Time : 3 Hours** **(Pages 5)** **Max. Marks : 80**

---

**प्र.1. अ) योग्य पर्याय शोधून खालील विधाने पूर्ण करा.** **4**

1) 'स्वामीजी, आपण आज्ञा केली असतीत तर, मी ..........

अ) स्वतः आलो असतो. ब) घरी आलो असतो.

क) आपल्या सेवेसाठी आलो असतो.

2) पेढे घेता घेता आणि अंगारा देता देता ..........

अ) सर्व घामाघूम होतात. ब) मुजावर घामाघूम होतात. क) सर्व शांत होतात.

3) लक्ष्मीचं नातं त्यानं सहज तोडलं आणि मुद्दामहून एक नवीन ..........

अ) संबंध जोडला. ब) नातेवाईक जोडला. क) धागेदोरे जोडले.

4) त्याचा दिवाणखाना पाहून मी ..........

अ) थक्क झालो. ब) चकीत झालो. क) थंडगार झालो.

**प्र.1. आ) रिकाम्या जागी कंसातील शब्दांपैकी योग्य शब्द वापरून वाक्ये पुन्हा लिहा.** **3**

1) मास्तरांची .......... तेरावी, चौदावीची मुलं अभ्यासत होती. (लेख, कविता, साहित्य)

2) बाहेर आपण .......... मिळवायला फिरावं. (जेवण, अन्न, भोजन)

3) खूप विचारांची .......... झाली. (दाटी, गर्दी, गडबड)

**प्र.1. इ) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.** **3**

1) आपणाला चमत्कारिक अवघडलेपण कशामुळे अनुभवाला येते ?

2) कशाच्या स्वागताची चाहूल लेखिकेला मोहरून टाकते आहे ?

3) वीणेची तार छेडल्यावर काही वेळानं तिचा नाद काय होतो ?

**प्र.2. अ) खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण करा.** **3**

1) ''खरा घनचक्कर तर मीच आहे.''

2) ''अरे तुम्ही माझ्याशी कसंही वागता, मग माझी पाने फाटतात.''

**प्र.2. आ) खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे ५० ते ६० शब्दांत लिहा.** **9**

1) निसर्गाची आपणाकडून कोणती अपेक्षा आहे ?
2) पुस्तकरावाला कशाकशाचा त्रास होतो ?
3) महात्मा गांधी यांची श्रमप्रतिष्ठेची शिकवण प्रत्यक्षात आणण्यासाठी लेखकाने शालेय वयात कोणकोणती कामे केली ?
4) 'सुर्वे यांच्या कवितेतील भाव मला समजत नसे' असे कृष्णाबाई का म्हणतात ?
5) परिवर्तनात कोणत्या भिंती ओलांडणे, लेखिकेस अपेक्षित आहे ?

**प्र.3. अ) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.** **3**

1) संत सेना महाराजांसाठी आजचा दिवस कसा आहे ?
2) घरट्यात कोणत्या फुलांचा संभार नाही ?
3) कशाचे मंदिर घडवावे, असे कवयित्रीला वाटते ?

**प्र.3. आ) रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द भरून पंक्ती पुन्हा लिहा.** **3**

1) सारा .......... बदलावा, माणसाला बदलण्यासाठी. (संसारच, निसर्गच, परिवारच)
2) समतेचं अंगण, झिजणारं .......... (गोंदण, वंगण, चंदन)
3) तया आवडे .......... श्वासा-घणांचें. (संगीत, काव्य, गीत)

**प्र.4. अ) कोणत्याही एका पद्यपंक्तीचा संदर्भ देऊन सरळ अर्थ लिहा.** **3**

1) 'कृपा करी पंढरीनाथा । दीनानाथ तूं समर्था ।।
अपराध करी क्षमा । तुझा न कळे महिमा ।।'
2) 'वळण वाकड्या नदीत आहे खळखळते पाणी
नजर पाखरू भिरभिरे पण अबोल होई वाणी'

**प्र.4. आ) कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे ५० ते ६० शब्दांत लिहा.** **9**

1) कवीला कोणता प्रलय अपेक्षित आहे ? का ?
2) संत सेना महाराज यांनी संतांच्या भेटीने होणाऱ्या आनंदाचे वर्णन कसे केले आहे ?
3) कवीच्या मनातील बेचैनीचे भाव केव्हा नाहीसे होतात ?
4) जीवनातील श्रमाचे महत्त्व कवी ग.दि. माडगूळकर यांनी कसे सांगितले आहे ?
5) कवीच्या मते स्त्रीने आपले हक्क मिळविण्यासाठी काय करावे ?

**प्र.5. खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे ६० ते ७० शब्दांत लिहा.** **8**

1) स्वातंत्र्य चळवळीचे लोण ग्रामीण भागात कसे पसरले होते ते लिहा.
2) कोल्हापुरी गुळाचे वर्णन लेखकाने कसे केले आहे ?
3) जुईचे आईबाबा घरी कोणती कामे करतात?
4) पाण्याचे महत्त्व, अम्मा पत्रातून कशी लिहिते ?

**किंवा**

**खालीलपैकी कोणत्याही एका पाठाचा सारांश १०० ते १२० शब्दांत तुमच्या भाषेत लिहा.** **8**

1) 'नातवंडास पत्र' या पाठाचा सारांश लिहा.
2) 'मुलांचे स्वप्न' या पाठाचा सारांश लिहा.

**प्र.6. अ) खालीलपैकी कोणतेही एक वाक्य लेखननियमानुसार लिहा.** **2**

1) मासतरही माझ्या उततराची अपेक्षा करत नसत.
2) माणसाचे आयुश्य केवळ क्षणभंगूर आहे.

**प्र.6. आ) खालीलपैकी कोणत्याही दोन सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.** **2**

1) जिजालक्ष्मी 2) सप्ताह 3) भाजीपाला 4) न्यायान्याय

**प्र.6. इ) कंसातील सूचनेनुसार बदल करून वाक्ये लिहा. (कोणतेही दोन)** **2**

1) हा साप खूपच विषारी आहे. (उद्गारार्थी करा.)
2) असे बसून कसे चालेल ? (विधानार्थी करा.)
3) बरोबर काही न्यायचे नाही. (प्रश्नार्थी करा.)

**प्र.6. ई) कंसात दिलेल्या वाक्यप्रचारांचा योग्य वापर करून वाक्ये लिहा. (कोणतेही चार)** **4**

(आनंदविभोर होणे, सोस असणे, हिरावून घेणे, क्षणभंगुर असणे, विध्वंस करणे, बेगमी करणे)

1) वनिताला इतरांना सहकार्य करण्याची खूप आवड आहे.
2) पावसाळा सुरू होणार म्हणून मुंग्यांनी खायच्या वस्तूंचा साठा केला.
3) निसर्गाच्या सान्निध्यात मला खूप आनंद होतो.
4) कोणाच्याही सणाचा आनंद हिसकावून घेणे योग्य नव्हे.
5) मानवी जीवनातील सुख हे क्षणात नाहिसे होणारे आहे.
6) वृक्षतोड करून मानवाने निसर्गाचा नाश केला.

**प्र.7. अ) खालील उतारा वाचून त्यावर चार प्रश्न तयार करा.** **4**

निसर्गातील प्रत्येक दृश्य माणसाच्या मनाला आनंदित करणारे आहे. सूर्यास्ताच्या वेळी आकाशात अवर्णनीय शोभा दिसते. सूर्यबिंब लालभडक झालेले असते आणि मेघांच्या पटलावर संध्यारागाच्या अनंत छटा पसरलेल्या असतात. किलबिलाट करीत घरट्याकडे पक्षी परतत असतात. सकाळी भिन्न भिन्न मार्गांनी उडालेले हे पक्षी संध्याकाळी मात्र गटागटाने घरट्याकडे येतात. रानावनात चरावयास गेलेली गुरेढोरे सुद्धा आतुरतेने घराकडे येत असतात. गाईंची आचळं वासरांच्या ओढीने तुडूंब भरलेली असतात. अधीर होऊन हंबरतच त्या गोठ्याकडे धावतात. तेव्हा त्यांच्या गळ्यातील तो घंटानाद कानाला तृप्त करतो. त्याचवेळी त्यांच्या पावलांनी उडालेली धूळ वातावरणातील लाल रंगात मिसळते आणि वातावरणाला पवित्र करते. मंद मंद वाऱ्याच्या झुळका झाडे वेलींना हिंदळवतात. हळूहळू काळोखाची मखमल धरती पांघरते आणि सारे विश्व विश्रांतीत रममाण होते.

**प्र.7. आ) खाली दिलेल्या मुद्यांवरून गोष्ट लिहा. योग्य शीर्षक देऊन तात्पर्य लिहा. (कोणतीही एक)** **4**

1) **मुद्दे** : एक वृद्ध शेतकरी – शेतात आंब्याची रोपे लावणे – तेथून राजाचे आगमन – आश्चर्य – ''या झाडांची फळे तुला कशी खायला मिळणार ?'' राजाचा प्रश्न – 'मी ज्या झाडाचे आंबे खातो आहे ती मी लावलेली नाहीत' – शेतकऱ्याचे उत्तर – राजाला आनंद – मोहरांची थैली बक्षीस – तात्पर्य.

2) **मुद्दे** : लोभी माणूस – देवाची भक्ती – प्रसन्न – सोन्याची मागणी – झोळीत सोने – ''खाली पडले तर माती होईल'' – झोळी भरते – जड होऊन फाटते – सगळी माती होणे – तात्पर्य.

**प्र.7. इ) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्र लिहा.** **4**

1) कृणाल / कमल माने,१३५, साईसदन, सदाशिव पेठ, पुणे येथून रस्त्यावरील कचरापेटीची दुर्दशा मा.आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे यांना पत्र लिहून कळवत आहे. (लिफाफा आवश्यक)

2) संदिप/ सुदिपा चव्हाण, लोकमान्य टिळक रोड, भांडूप (पू.), मुंबई - ४२ हा/ ही रस्त्यावरील कर्कश आवाजामुळे अभ्यासात येणाऱ्या व्यत्ययाबद्दल पोलीस इन्स्पेक्टर, भांडूप पोलीस स्टेशन, मुंबई - ४२ यांच्याकडे तक्रार करतो/ करते. (लिफाफा आवश्यक)

**किंवा**

**खालील विषयावर वृत्तांत लिहा.** **4**

तुमच्या शाळेतील दहावीचा विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभाचा वृत्तांत लिहा.

**किंवा**

**खालील विषयावर जाहिरात लेखन करा.** **4**

बँकेतर्फे देण्यात येणाऱ्या शुभेच्छेची जाहिरात तयार करा.

**प्र.8. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर दिलेल्या मुद्यांच्या आधारे १५० शब्दांपर्यंत निबंध लिहा.** **10**

1) मला पंख असते तर ......

**मुद्दे :-** पंख असावेत असे का वाटते ? - शहरातील रस्त्यावरची रहदारी टाळता येईल - पटकन हवे तेव्हा कोठेही जाता येईल - शाळेत वेळेवर पोचता येईल - पंखांमुळे कोणत्याही झाडावर जाऊन फळे मिळतील - कोणी रागावले, भांडले तर उडून जाता येईल - आई, बाबा, शिक्षकांची फजिती - पण आकाशात सुद्धा पक्षी चिडतील - चोचींचा मार.

2) मी मायमराठी बोलतेय ...

**मुद्दे :-** वैभवशाली भूतकाळ - राज्यभाषा - साहित्यातून लोकांची सेवा - लेखक, कवींनी दिलेला सन्मान - आधुनिकतेमुळे होणारी हानी - परकीय भाषांचा प्रभाव - होणारे दुःख - भविष्याबद्दल आशावादी.

3) बालपणातील अविस्मरणीय प्रसंग

**मुद्दे :-** बालपणाचा काळ सुखाचा - दैनंदिन कार्यक्रम - बालपणातील गंमतीजंमती - निरागसता - अविस्मरणीय प्रसंग - त्याचे वर्णन - मनाला मिळालेला आनंद - शेवट.

**Best Of Luck** 👍

# MT-162

2014 .... .... 1100

MT - 162 - MARATHI (SECOND OR THIRD LANGUAGE) (M) - PRELIM II - PAPER - IV

**Time : 3 Hours** **Preliminary Model Answer Paper** **Max. Marks : 80**

| | | |
|---|---|---|
| उ. **1.** | **अ) योग्य पर्याय शोधून खालील विधाने पूर्ण करा.** | |
| 1) | 'स्वामीजी, आपण आज्ञा केली असतीत तर, मी आपल्या सेवेसाठी आलो असतो. | **1** |
| 2) | पेढे घेता घेता आणि अंगारा देता देता मुजावर घामाघूम होतात. | **1** |
| 3) | लक्ष्मीचं नातं त्यानं सहज तोडलं आणि मुद्दामहून एक नवीन नातेवाईक जोडला. | **1** |
| 4) | त्याचा दिवाणखाना पाहून मी थक्क झालो. | **1** |
| उ. **1.** | **आ) रिकाम्या जागी कंसातील शब्दांपैकी योग्य शब्द वापरून वाक्ये पुन्हा लिहा.** | |
| 1) | मास्तरांची कविता तेरावी, चौदावीची मुलं अभ्यासत होती. | **1** |
| 2) | बाहेर आपण अन्न मिळवायला फिरावं. | **1** |
| 3) | खूप विचारांची दाटी झाली. | **1** |
| उ. **1.** | **इ) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.** | |
| 1) | आपणाला नात्यातल्या जवळिकीमुळे चमत्कारिक अवघडलेपण अनुभवाला येते. | **1** |
| 2) | वसंतऋतूच्या स्वागताची चाहूल लेखिकेला मोहरून टाकते आहे. | **1** |
| 3) | वीणेची तार छेडल्यावर काही वेळानं तिचा नाद विरून जातो. | **1** |
| उ. **2.** | **अ) खालीलपैकी कोणत्याही एका वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण करा.** | |
| 1) | **संदर्भ** : वरील वाक्य 'शाश्वत शिक्षणसंपत्ती' या 'चंद्रशेखर धर्माधिकारी' यांच्या पाठातून घेण्यात आले आहे. या पाठात लेखकाने त्यांच्या शिक्षकांबद्दलची कृतज्ञता व्यक्त करत त्यांच्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला आहे.<br>**स्पष्टीकरण** : स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळात लेखक व त्यांच्या मित्रांचा एक क्लब होता. त्यातील सारी मुले कधीही जाती, वर्ग पाळत नव्हती. मुलांचा एकूण व्यवहार व वृत्ती बघून त्यांचे वडील दादा धर्माधिकारी यांनी त्या क्लबला 'घनचक्कर समाज' हे नाव सुचविले. एकदा ते महात्मा गांधीजींकडे ते नाव सांगायला गेले. तेव्हा गांधीजी हसले व म्हणाले, 'खरा घनचक्कर तर मीच आहे.' कारण 'घन' म्हणजे 'ठोस' व 'चक्कर' म्हणजे 'गतिशील' होय. गांधीजीसुद्धा त्यांच्या जीवनात दृढनिश्चयी व गतिशील म्हणजेच उद्योगी होते. आपला प्रत्येक क्षण भारतीय स्वातंत्र्यासाठी आणि समाजाच्या सेवेसाठीच त्यांनी खर्च केला.<br>**वैशिष्ट्य** : महात्मा गांधीजींची कार्यतत्परता येथे दिसून येते. | **3** |

| | | |
|---|---|---|
| 2) | **संदर्भ** : वरील वाक्य 'काय राव पुस्तकराव !' या लेखक 'दासू वैद्य' यांच्या पाठातून घेण्यात आले आहे. या पाठात लेखक आपल्या जीवनातील पुस्तकांचे महत्त्व सांगतात. तसेच पुस्तकांची काळजी घेण्याबाबत मार्गदर्शन करतात.<br>**स्पष्टीकरण** : मंदार आणि मानसी अभ्यास करता करता झोपतात. मंदार पुस्तक बाजूला टाकून देतो आणि झोपतो तर मानसी पुस्तक वाचता वाचता झोपते. तिच्या अंगाखाली पुस्तक पार चुरगळले जाते. त्यामुळे पुस्तकांना फार त्रास होतो. त्याचबरोबर मोठी माणसेही कधीकधी पुस्तकं, कादंबऱ्या वाचतात. अर्धवट वाचून झाल्यावर खूण म्हणून पुस्तकाचे पान दुमडून ठेवतात. शिवाय कधी कधी पुस्तकं माळ्यावर, गाडीच्या डिकीत टाकून देतात. अशा प्रकारच्या वागण्याने पुस्तकांची खराब अवस्था होते. त्यांची पाने फाटतात. त्यामुळेच मानसी व मंदारला याची जाणीव करून देण्यासाठी पुस्तकरावांनी दुःखी होऊन वरील विधान म्हटले आहे.<br>**वैशिष्ट्य** : पुस्तकं प्रेमाने, काळजीपूर्वक हाताळावीत हे येथे सुचविले आहे. | **3** |
| उ.**2.** | **आ) खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे ५० ते ६० शब्दांत लिहा.** | |
| 1) | 'निसर्गवेध' हा पाठ लेखक 'बी. जी. वाघ' यांनी लिहिला आहे. या पाठात लेखकाने निसर्ग आपल्याला समृद्ध आणि आनंदी जगणे शिकवतो, हे दाखवून दिले आहे.<br>फुलं ज्या सहजपणाने फुलतात, सहज रंग धारण करतात, सहजतेनं विकसित होतात, त्याप्रमाणेच माणसाचे जीवन फुलले पाहिजे. फुलण्याचा, बहरण्याचा कुणाचा अधिकार कुणी हिरावून घेऊ नये. कुणी कुणाचा मालक होऊ नये. त्याचप्रमाणे कुणी कुणाचा गुलाम होऊ नये. माणसे जर पाखरासारखी उडून जाणार असतील, तर पाखरासारखीच त्यांनी बेगमी केली पाहिजे. पिढ्या न् पिढ्या आपल्या संततीने कुठलेही कष्ट न करता जगावे इतकी संपत्ती माणसाने जमा करु नये. शिवाय अशी जमवलेली संपत्ती असेल तर अशा संपत्तीवर त्याच्या मुलाबाळांनी अधिकार सांगावा इतके वाईट जीवन त्याच्या मुलांनी स्वीकारू नये. आपल्या वाईटाचा वारसादेखील पुढील पिढ्यांवर लादू नये.<br>अशाप्रकारे स्वाभाविकपणे बहरा आणि इतरांनाही बहरू द्या, अशी निसर्गाची आपणाकडून माफक अपेक्षा आहे. | **3** |
| 2) | 'काय राव पुस्तकराव !' हा पाठ लेखक 'दासू वैद्य' यांनी लिहिला आहे. प्रस्तुत नाटिकेत लेखक आपल्या जीवनातील पुस्तकांचे महत्त्व सांगतात. तसेच पुस्तकांची काळजी घेण्याबाबत मार्गदर्शन करतात.<br>मानसी पुस्तक वाचता वाचता पुस्तकावर झोपी जाते. त्यामुळे ते चुरगळून जाते. त्यामुळे पुस्तकरावांच्या पायाला दुखापत होते. मंदारदेखील रात्री पुस्तक वाचताना तसेच खाली टाकून देतो. त्यामुळे त्या पुस्तकाची पाने मुडपतात आणि पुस्तकरावांचे सारे अंग ठणकत असते. मोठी माणसेदेखील कादंबऱ्या वाचतात. अर्धवट वाचून झाल्यावर खूण म्हणून पुस्तकाचेच पान मुडपतात. तर काहीजण त्यांना माळ्यावर, गाडीच्या डिकीत टाकून देतात. | **3** |

| | | |
|---|---|---|
| | अशाप्रकारे मानसीच्या, मंदारच्या व मोठ्या माणसांच्या वागण्याचा पुस्तकरावांना त्रास होतो. | |
| 3) | 'शाश्वत शिक्षणसंपत्ती' हा पाठ लेखक 'चंद्रशेखर धर्माधिकारी' यांनी लिहिला आहे. 'ज्या शिक्षकांकडून शिकायला मिळाले, जगायला मिळाले, तीच खरी शिक्षणसंपत्ती ठरली', ही लेखकाची स्वतःची भावना येथे व्यक्त होत आहे.<br>'शारीरिक श्रमांना' प्रतिष्ठा मिळावी म्हणून महात्मा गांधीजींनी 'चरखा' हे त्याचे प्रतीक मानले होते. लेखक व त्याचे मित्र लहानपणी खेळ सुरू करण्यापूर्वी अर्धा ते एक तास सूतकताई करीत असत. सूतकताई हे उत्पादक शारीरिक परिश्रमाचे प्रतीक मानले जात असे. श्रमामुळे श्रमप्रतिष्ठा स्थापन होऊन, आर्थिक विषमता संपेल अशी गांधीजींची भावना होती. तसेच त्यांचे 'सामाजिक विषमता' संपविणारे क्रांतीचे दुसरे प्रतीक 'झाडू' होते. म्हणून लेखक व त्याचे मित्र मिळून संडास सफाईपासून सारी सफाईची कामे करीत असत.<br>अशाप्रकारे लेखकाने शालेय वयातच श्रमप्रतिष्ठेची शिकवण अंमलात आणण्यासाठी वेगवेगळी कामे केली. | **3** |
| 4) | 'मास्तर आणि मी' हा पाठ लेखिका 'कृष्णाबाई सुर्वे' यांनी लिहिला आहे. या पाठात सुप्रसिद्ध कवी नारायण सुर्वे यांच्या जीवनातील महत्त्वाच्या प्रसंगांचे वर्णन केले आहे.<br>सुर्वे यांच्या कवितांची पहिली श्रोता कृष्णाबाईच असायच्या. कविता लिहून झाली की सुर्वे ती कविता लेखिकेला वाचून दाखवायचे. सुर्वे कविता लिहितात यांचा आनंद लेखिकेलाही व्हायचा. पण तो आनंद कसा व्यक्त करायचा, हे त्यांना समजत नसे. अनेकदा संसाराच्या, पोराटोरांच्या विवंचनेत असल्यामुळे आणि उद्याच्या विचारात असल्यामुळे मास्तरांच्या कवितेचे शब्द त्यांच्या कानावर पडायचे, पण त्यातला भाव लेखिकेला समजायचाच नाही. कारण त्यांचे स्वतःचे मन त्यांना सांगायचे की कृष्णाबाई तुला काही कळतंय का त्यातले? कारण तू एक अडाणी बाई आहेस ? तुला काही समजणार नाही आणि बावळटासारखं उगाच काहीतरी बोलून स्वतःच हसू करून घेशील.<br>अशाप्रकारे कृष्णाबाई स्वतःच्या न्युनगंडामुळेच गप्प बसायच्या. म्हणूनच त्या म्हणतात, 'सुर्वे यांच्या कवितेतील भाव मला समजत नसे.' | **3** |
| 5) | 'परिवर्तनाचे उत्सव' हा पाठ लेखिका 'विद्या बाळ' यांनी लिहिला आहे. या पाठात निसर्गातील ऋतू बदलानुसार जे उत्सव साजरे केले जातात त्यात काळानुसार परिवर्तन करणे आवश्यक आहे, हा विचार मांडला आहे.<br>आनंदोत्सव साजरे करताना साऱ्या जातीपातींचे, धर्मांचे अडसर ओलांडायचे आहेत. त्याचबरोबर त्या प्रत्येक जातीजमातींमध्ये, बायाबायांमध्ये नवरा असलेली-नसलेली, मुलं असलेली-नसलेली, असे जे 'कोत्या' मनाने केलेले भेदाभेद आहेत, त्याच्या भिंतीही पार | **3** |

| | | |
|---|---|---|
| | केल्या पाहिजेत. तसेच जुन्या सणवार, व्रतांमागे असलेली धर्मविशिष्टतादेखील पार केली पाहिजे. शिवाय जातिधर्माशी, लिंगभेदाशी चिकटून न बसता निसर्गाशी नाते जोडले पाहिजे, असे लेखिकेला वाटते. | |
| | अशाप्रकारे निसर्गाशी, पर्यावरणाशी नातं सांगत परिवर्तनात जातीपातीच्या, धर्माच्या, भेदाभेदाच्या भिंती ओलांडणे लेखिकेला अपेक्षित आहे. | |
| उ.**3.** | **अ) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.** | |
| 1) | संत सेना महाराजांसाठी आजचा दिवस सोन्याचा (अतिशय आनंदाचा) आहे. | **1** |
| 2) | घरट्यात कल्पफुलांचा संभार नाही. | **1** |
| 3) | सुखशांतीचे मंदिर घडवावे, असे कवयित्रीला वाटते. | **1** |
| उ.**3.** | **आ) रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द भरून पंक्ती पुन्हा लिहा.** | |
| 1) | सारा **निसर्गच** बदलावा, माणसाला बदलण्यासाठी. | **1** |
| 2) | समतेचं अंगण, झिजणारं **चंदन**. | **1** |
| 3) | तया आवडे **गीत** श्वासा-घणांचें. | **1** |
| उ.**4.** | **अ) कोणत्याही एका पद्यपंक्तीचा संदर्भ देऊन सरळ अर्थ लिहा.** | |
| 1) | **संदर्भ** : वरील पद्यपंक्ती 'कृपा करीं पंढरीनाथा' या अभंगातून घेतल्या आहेत. 'संत नरहरी सोनार' यांनी हा अभंग लिहिला आहे. या अभंगामध्ये भक्तांचा सांभाळ करणाऱ्या पंढरीच्या विठ्ठलाचा महिमा वर्णन केला आहे.<br>**स्पष्टीकरण** : विठ्ठलाचे गुणवर्णन संत नरहरी सोनार मनापासून करतात. ते म्हणतात की, हे पंढरीनाथा आम्हा भक्तांवर तू नेहमीच कृपा कर. गोरगरीबांची मदत करणारा, त्यांच्या अडीअडचणींच्या वेळी धावून जाणारा तू दीनानाथ आहेस. हे दीनांच्या नाथा तूच सर्वशक्तिमान, समर्थ आहेस. जीवन जगत असताना आमच्याकडून अनेक चुका होतात. अनेक अपराध घडतात. तू आमच्या अपराधांना क्षमा कर. हे पंढरीनाथा, तुझा महिमा अमर्याद आहे. कितीही समजून घेण्याचा प्रयत्न केला तरी तो आम्हाला कळत नाही, समजत नाही.<br>**वैशिष्ट्य** : अनोख्या शब्दांत विठ्ठलाचा मोठेपणा संत नरहरी सोनारांनी येथे व्यक्त केला आहे. | **3** |
| 2) | **संदर्भ** : वरील पद्यपंक्ती 'गाव' या कवी 'अनिल पाटील' यांच्या कवितेतून घेण्यात आल्या आहेत. या कवितेतून गावाबद्दलची ओढ व्यक्त झाली आहे.<br>**स्पष्टीकरण** : गावातील निसर्गसौंदर्याचे वर्णन कवी अगदी भावूकपणे करतो. त्याच्या गावी वेडीवाकडी वळणे घेत घेत वाहणाऱ्या नदीत खळखळणारे पाणी आहे. हे सौंदर्य पाहताना कवीची नजर पाखरासारखी सर्वत्र भिरभिरते. या सौंदर्याचे वर्णन करताना त्याला शब्दच | **3** |

| | | |
|---|---|---|
| | सापडत नाहीत म्हणून त्याची वाणी अबोल होते. जणू निसर्गाच्या सौंदर्यात, त्या धुंद वातावरणात कवीचे मन शांत शांत होत जाते.<br>**वैशिष्ट्य** : निसर्गसौंदर्याचा मानवी मनावर होणारा सुखद परिणाम येथे दिसून येतो. | |
| उ.**4.** | **आ) कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे ५० ते ६० शब्दांत लिहा.** | |
| 1) | 'प्रलय' ही कविता कवी 'रोहिदास पोटे' यांनी लिहिली आहे. या कवितेत कवीने माणसातील माणूसपण कोणत्याही बंधनांनी जखडलेले नसावे, असा विचार व्यक्त केला आहे.<br>समाजातील चालीरिती, रूढी, जातीव्यवस्था इ. गोष्टींमुळे माणूस माणूसपण हरवत चालला आहे. त्यामुळे कवी अस्वस्थ होतो. अशावेळी कवीला वाटते की, खूप मोठा प्रलय व्हावा. ज्यायोगे स्वार्थाने, मीपणाने भरलेली घरे व शहरे म्हणजेच स्वार्थी सामाजिक समूह नष्ट व्हावेत. त्या जागेवर एकाच आकाराची, विचाराची, उंचीची भेदाभेदरहित घरे व शहरे निर्माण व्हावीत. माणसाचे विचार समाजातील जुन्या वाईट विचारांना धरून पुढे जात आहेत. त्यामुळे असा प्रलय व्हावा की विचारांचे प्रवाह बदलावेत आणि चांगल्या विचारांच्या झऱ्यांनी तळागाळातील लोकांची प्रगती व्हावी. त्यामुळे समाजातील विषमता नष्ट होईल व समानता निर्माण होईल. त्याचप्रमाणे 'माणूस' व 'माणुसकी' यांचे अतूट नाते निर्माण होईल. समाजात सकारात्मक बदल होऊन मातीलाही कष्टाच्या भाकरीचा सुगंध येईल.<br>अशाप्रकारे माणसालाही माणूस म्हणून किंमत प्राप्त व्हावी असा प्रलय कवीला अपेक्षित आहे. | **3** |
| 2) | 'आजि सोनियाचा दिवस' हा अभंग 'संत सेना महाराज' यांनी लिहिला आहे. या अंभगात संतांच्या सान्निध्यात मिळणाऱ्या आनंदाचे वर्णन केले आहे.<br>संत सेना महाराज म्हणतात की, संतांचे दर्शन झाल्यामुळे हा दिवस माझ्यासाठी सोन्यासारखा झाला आहे. संतांच्या सान्निध्यात राहिल्यामुळे त्यांच्या जीवाला सुख प्राप्त झाले आहे. जसे सासरी गेलेल्या मुलीला माहेरची माणसे भेटल्यावर आनंद, सुख प्राप्त होते. तसाच सर्व संतमेळा पाहून आपल्या माणसांना भेटल्याचा आनंद संत सेना महाराज यांना झाला आहे. त्यांच्या मनातील दुःख दूर होऊन त्यांच्या मनाला शांतता प्राप्त झाली आहे. जीवाचा सारा थकवा दूर झाला आहे. अशाप्रकारे संतचरण पाहिल्यामुळे जणू घराला सण उत्सवाचे रूप आले आहे. ज्याप्रमाणे दिवाळी-दसरा आल्यावर मन आनंदी, उत्साही होते त्याप्रमाणे संतांच्या सान्निध्यात मन आनंदाने, सुखाने भरून गेले आहे.<br>अशाप्रकारे संत सेना महाराज यांनी संतांच्या भेटीने होणाऱ्या आनंदाचे वर्णन केले आहे. | **3** |
| 3) | 'गाव' ही कविता कवी 'अनिल पाटील' यांनी लिहिली आहे. या कवितेतून गावाबद्दलची ओढ व्यक्त झाली आहे. | **3** |

| | | |
|---|---|---|
| | कवीचे गाव निसर्ग सौंदर्याने नटलेले आहे. कवीला आपले गाव खूप खूप आवडते. परंतु असे असले तरी पोट भरण्यासाठी त्याला दूर शहरात जावे लागले. वीतभर पोटासाठी त्याला आपले लाडके गाव सोडावे लागले. त्यामुळे गावाच्या अनावर ओढीने त्याचे मन बेचैन होते, अस्वस्थ होते. अशा परिस्थितीमध्ये जेव्हा जेव्हा त्याच्या डोळ्यांसमोर त्याचे गाव आठवणींच्या रूपात दिसू लागते तेव्हा त्याच्या मनातील बेचैनीचे भाव निघून जातात. गावाच्या आठवणींमुळे त्याच्या मनाला शांतता, समाधान लाभते.<br>अशाप्रकारे जेव्हा कवीला त्याचे गाव आठवणीतून डोळ्यांसमोर दिसते तेव्हा त्याच्या मनातील बेचैनीचे भाव नाहीसे होतात. | |
| 4) | 'जिथे राबती हात' ही कविता कवी 'ग.दि. माडगूळकर' यांनी लिहिली आहे. या कवितेत कवीने आपल्या जीवनातील श्रमाचे महत्त्व सांगितले आहे.<br>ग. दि. माडगूळकर श्रमाचे महत्त्व पटवून देताना म्हणतात की, परमेश्वर देवालयात किंवा मंदिरात राहत नाही. ज्याठिकाणी माणसे कष्ट करतात तेथे परमेश्वर असतो. या परमेश्वराला मुनिब्राह्मणांच्या मंत्र-तंत्रापेक्षा कष्टाळू माणसांच्या श्वासांचा, तसेच काम करताना त्यांच्या अवजारांचा होणारा आवाज आवडतो. शेतकरी आपल्या शेतात घाम गाळून कष्ट करतो. तेथे श्याम अन्नधान्याच्या रूपात उभा राहतो. पाथरवट रस्त्यावर बसून दगड फोडतात. दगडांना वेगवेगळे आकार देतात. शिवाय विणकर लोक अपार मेहनत करून कापसापासून छान कापड बनवतात. अशा कष्टाळू लोकांच्या घरी परमेश्वर आनंदाने राहतो. याचाच अर्थ असा की, जिथे घाम गाळून कष्ट केले जातात तेथे परमेश्वराचे अस्तित्व असते.<br>अशाप्रकारे जीवनातील श्रमाचे महत्त्व पटवून देतांना कवी जणू सुचवतात की, कष्ट करा, मेहनत करा, तिथेच परमेश्वराची प्राप्ती आपणाला होईल. | **3** |
| 5) | 'आपण धरणी गं' ही कविता कवी 'ऋषीकेश कांबळे' यांनी लिहिली आहे. या कवितेत स्त्रीला तिच्या सामर्थ्याची जाणीव करून देत आपले हक्क मिळवण्याचे आवाहन केले आहे.<br>स्त्रीमध्ये सर्व प्रकारची योग्यता असते. ती त्यागमय जीवन जगत असते. स्वतः सर्व प्रकारचे हाल सोसून दुःख गिळून साऱ्या जगाला पोसत असते. स्वतःच्या मनाची, इच्छा-आकांक्षांची माती करून नातीगोती जपत असते. मात्र एवढे सगळे करूनही तिला सतत उपेक्षेला बळी जावे लागते. पण या सगळ्या गोष्टींचा आता भूतकाळ व्हावा असे कवितेतील स्त्री म्हणते.<br>या स्त्रीने इतर महान स्त्रियांची, त्यांच्या कर्तृत्वाची ओळख करून घ्यावी आणि आपणही त्याच मार्गाने चालावे अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. त्यासाठी तिने दुःख न बाळगता कणखर बनले पाहिजे असे कवितेतील स्त्री म्हणते. ती म्हणते, आता तू अन्यायाविरुद्ध ललकारी देऊन पुढे ये. अंधार दूर करण्यासाठी दिवा जसा जळतो तशी | **3** |

| | | |
|---|---|---|
| | आता तूही तुझ्या तेजाने तळपून जा आणि या अंधारावर मात करताना उजेडाचे गाणे म्हणत जा.<br>अशाप्रकारे आपले हक्क मिळविण्यासाठी स्त्रीने जागृत होऊन लढले पाहिजे, असे कवीला वाटते. | |
| उ.**5.** | **खालीलपैकी कोणत्याही <u>दोन</u> प्रश्नांची उत्तरे ६० ते ७० शब्दांत लिहा.** | |
| 1) | <u>'प्रतिसरकार'</u> हा पाठ लेखक <u>'नागनाथअण्णा नायकवडी'</u> यांनी लिहिला आहे. या पाठात सातारा जिल्ह्यातील इंग्रजी शासनाच्या जोखडातून मुक्त अशा प्रतिसरकारच्या स्थापनेचे स्फूर्तिदायक वर्णन केले आहे.<br>१९४२ ला मुंबई येथील गवालिया टँक येथे गांधीजींनी इंग्रज सत्तेच्या विरोधात 'चले जाव' ची घोषणा दिली. त्यावेळी अनेक राष्ट्रीय नेत्यांना अटक झाली. अनेक कार्यकर्ते भूमिगतही झाले. देशभरात सगळीकडे 'चले जाव' आंदोलन तीव्र बनले. या आंदोलनाचे लोण ग्रामीण भागातही पसरले. अनेक ठिकाणी प्रचंड जमावांनी इंग्रज सत्तेविरूद्धचा असंतोष व चीड व्यक्त करण्यासाठी पोलीस ठाणे, पोष्ट, टेलिफोनच्या तारा तोडल्या होत्या. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी हरताळ पाळले होते. सातारा जिल्ह्यात कराड, पाटण, तासगांव, वडूज, इस्लामपूर, शिराळा, आटपाडी येथे मामलेदार कचेरीवर मोर्चे निघाले होते. इंग्रजांनी या प्रचंड मोर्चावर गोळीबार केला. त्यामध्ये वडूज मोर्चात ९ तर इस्लामपूर मोर्चात २ कार्यकर्ते हुतात्मा झाले. अनेकजण जखमी झाले. अनेकांना तुरूंगात डांबले गेले. त्यातूनच पुढे स्वतःचे स्वतंत्र सरकार निर्माण करावयाचे, या विचाराने गावागावात 'प्रतिसरकार' निर्माण करावयाची कल्पना पुढे आली.<br>अशाप्रकारे स्वातंत्र्य चळवळीचे लोण ग्रामीण भागातही पसरले. | **4** |
| 2) | <u>'गावाची संस्कृती हे गावाचे व्यक्तिमत्त्व'</u> हा पाठ लेखक <u>'आनंद यादव'</u> यांनी लिहिला आहे. या पाठात एकच मराठी संस्कृती असलेल्या खेड्यांची, शहरांची वेगवेगळी सांस्कृतिक वैशिष्ट्ये व त्यातून दिसणारे त्या त्या गावाचे व्यक्तिमत्त्व यांचे वर्णन लेखकाने केले आहे.<br>लेखक हायस्कूलमध्ये शिकत असताना त्याला गुळाच्या गाड्यांबरोबर जावे लागे. शाहूपुरीतील अडत दुकानात उतरून गुळाचा हिशोब घेऊन येण्याची जबाबदारी वडिलांनी त्याच्यावर सोपवलेली होती. कोल्हापुरात त्यावेळी गुऱ्हाळांचा एक विशिष्ट काळ असे. हा गुळ कोल्हापुरी गुळ म्हणून प्रसिद्ध होता. तो खरेदी करण्यासाठी गुजरातहून व्यापारी मंडळी येत. कोल्हापुरी गुळाची चव खास आहे. हा ताजा गूळ शाहूपुरीत सर्वत्र ढेपाढेपांनी रचलेला दिसे. त्याचा गंध आल्यानंतर तो खाण्याचा मोह कोणालाही होई. त्याचा रंगही असाच मनाला आकर्षित करणारा असे. कोल्हापुरी गुळाच्या चवीचे आणि रंगगंधाचे हे वैशिष्ट्य या पंचक्रोशीतील 'माती'च्या गुणातूनच निर्माण झालेले आहे.<br>अशाप्रकारे लेखकाने कोल्हापुरी गुळाचे वर्णन केले आहे. | **4** |

| | | |
|---|---|---|
| 3) | <u>'मुलांचे स्वप्न'</u> हा पाठ लेखिका <u>'सोनाली नवांगुळ'</u> यांनी लिहिला आहे. या पाठात मानवी स्वभाव आणि वृक्षांची दातृत्वाची, सहकार्याची वृत्ती याचे रंजक वर्णन केले आहे.<br>जुईची आई वाचनालयात कामाला जायची आणि बाबा घरातल्या हॉलमध्ये मुलांची शिकवणी घ्यायचे. खूप मुले-मुली त्यांच्याकडे शिकायला यायची. जुईची आई घरातली शक्य तितकी कामं करून वाचनालयात जाते. जुईचे बाबा जुईला जेवायला वाढतात आणि मग स्वतः जेवून भांडीही धुवून ठेवतात. जुई जेव्हा शाळेतून येते, तेव्हा जुईची आई भाजी, दळण घेऊन येत असते. ती यायच्या आधीच जुईचे बाबा मस्त चहा करतात आणि सगळे चहा पितात. जुईची आई पटकन चटमट खाऊ करते. नंतर बाबा क्लास घ्यायला तयार होतात. जुई खेळून आल्यावर जुईचे आई किंवा बाबा जुईचा अभ्यास घेतात. जुईची आई स्वयंपाक करते. बाबा ताटं घेतात. मग सगळे मिळून जेवतात.<br>अशाप्रकारे जुईचे आईबाबा एकमेकांच्या सहकार्याने घरातली सारी कामे करतात. | **4** |
| 4) | <u>'नातवंडांस पत्र'</u> हा पाठ लेखिका <u>'मृणालिनी साराभाई'</u> यांनी लिहिला आहे. या पाठात लेखिकेने आपल्या नातवंडांना जीवन जगत असताना आपल्याला आनंद देणाऱ्या प्रत्येक गोष्टीबाबत आपण कृतज्ञ असले पाहिजे, हा मोलाचा संदेश पत्राच्या माध्यमातून किला आहे.<br>पाण्याचे महत्त्व सांगताना अम्मा लिहिते की, स्नान करताना आपण पर्वतांमधून, खोल खोल दऱ्याखोऱ्यांमधून व महान नद्यांतून येणाऱ्या आशीर्वाद स्वरूप पाण्याचे स्मरण ठेवावे. कोणतेही जीवन पाण्याविना अशक्य आहे. पिण्यासाठी जर एकही थेंब मिळाला नाहीतर आपली अवस्था खूप वाईट होईल. तेव्हा पाण्याबाबत खबरदारी घ्यावी. त्याचा एकही थेंब वाया जाणार नाही, याची काळजी घ्यावी. आपण देशातील जलस्त्रोत स्वच्छ ठेवायला मदत करायला हवी, अशी शपथ घेऊया. ज्यामुळे सगळ्या लोकांना पिण्यासाठी शुद्ध पाणी मिळेल. त्याचबरोबर पाण्याचे योग्य नियोजन केले पाहिजे.<br>अशाप्रकारे अम्मा पत्रातून पाण्याचे महत्त्व नातवंडांना समजावून सांगते. | **4** |
| | **<u>किंवा</u>**<br>**खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> पाठाचा सारांश १०० ते १२० शब्दांत तुमच्या भाषेत लिहा.** | |
| 1) | <u>'नातवंडांस पत्र'</u> हा पाठ लेखिका <u>'मृणालिनी साराभाई'</u> यांनी लिहिला आहे. या पाठात लेखिकेने आपल्या नातवंडांना जीवन जगत असताना आपल्याला आनंद देणाऱ्या प्रत्येक गोष्टीबाबत आपण कृतज्ञ असले पाहिजे, हा मोलाचा संदेश पत्राच्या माध्यमातून दिला आहे.<br>लेखिका आपल्या नातवंडांना पूर्णपणे ओळखते. त्यांच्या सवयी तिला माहिती आहेत. जगातील हिंसा, अभिलाषा, मत्सर या दुष्टप्रवृत्तीपासून तिला आपल्या नातवंडांस वाचवायचे आहे आणि म्हणून ती त्यांना म्हणते जेव्हा तुम्ही मोठे व्हाल तेव्हा या शत्रूंना जिंकून घ्या. यासाठी दिवसाची सुरूवात प्रार्थनेने करा. त्यामुळे मनातील वाईट विचार दूर होतील. एकत्र खेळण्याने एकोपा वाढतो. पण असे साधे खेळ खेळतानासुद्धा कुणाचा द्वेष करू नका.<br>ज्या धरतीने तुमचे पालनपोषण केले तिचे ऋण मानायला विसरू नका. पाणी हे जीवन आहे, त्याचा जपून वापर करा. निसर्गाचे संवर्धन करा. निसर्गाचा समतोल कायम ठेवायचा | **8** |

| | | |
|---|---|---|
| | असेल, पाऊस चांगला पडायला हवा असेल तर वृक्षांची जोपासना करायलाच हवी. जो शेतकरी त्याच्या देशासाठी अन्न पिकवतो त्याला किती कष्ट घ्यावे लागतात याचा विचार करा. आपण ब्रेड आणि लोणी ही न्याहारी करताना त्यासाठी कोणी किती कष्ट घेतले असतील याचा विचार करा. पुस्तक हे मित्र आहेत. तेव्हा ती वापरताना त्यांची काळजी घ्या. त्या पुस्तकात अनमोल ज्ञानाचे भांडार असते. पुस्तकातील शब्द म्हणजे मौज, कुतूहल असते. त्या शब्दांवर प्रेम करा. त्यांना वाचा म्हणजे सारे जग तुमच्यासाठी खुले होईल.<br>अशाप्रकारे शेवटी लेखिका आपल्या नातवंडास सांगते, स्वतः जगा व दुसऱ्यास जगू द्या. आपले जीवन इतरांना आनंद देण्यासाठी असावे. सर्वांना मदत करा आणि आपल्या कार्याने साऱ्या जगासाठी तुम्हीच आशीर्वाद व्हा. | |
| 2) | <u>'मुलांचे स्वप्न'</u> हा पाठ लेखिका <u>'सोनाली नवांगुळ'</u> यांनी लिहिला आहे. या पाठात मानवी स्वभाव आणि वृक्षांची दातृत्वाची, सहकार्याची वृत्ती याचे रंजक वर्णन केले आहे.<br>जुई आणि चिनार ही शहाणी मुलं होती. त्यांच्या शेजारचे आपल्या मुलांना सांगायचे, 'बघा, बघा किती शहाणी मुलं आहेत. आईबाबांना दमवत नाहीत. अभ्यास करतात. उलटं बोलत नाहीत.' खरंतर अशा कौतुकाचा कुणालाही आनंदच होतो. पण चिनार आणि जुईला मात्र वाईट वाटायचे. चिनार आणि जुईचे आईबाबा काम करून खूप दमायचे. चिनारचे आई व बाबा दोघंही मिळून एक छोटं हॉटेल चालवायचे. जुईची आई वाचनालयात कामाला जायची आणि बाबा घरातल्या हॉलमध्ये मुलांची शिकवणी घ्यायचे. चिनार आणि जुई या दोघांना वेळच मिळत नसल्यामुळे मनात इच्छा असूनसुद्धा दोघेही आईवडिलांना कामात मदत करू शकत नव्हते. तरीही लोकांनी त्यांना चांगलं म्हटलं तर आपण खोटारडेच आहोत, असे वाटून त्यांना त्या गोष्टीचं वाईट वाटायचे.<br>एके रविवारी जुई आणि चिनार एकमेकांना भेटले. चालता चालता एक फूल टपकन चिनारच्या डोक्यात पडले. जुईनेही फुलांच्या सड्यावर नजर टाकली. दोघांच्या डोक्यात एकाचवेळी एक विचार आला. कोणतेही झाड असो, ते किती उपयोगी पडते. त्यामुळे कसंही करून आपण झाड व्हायचं आणि सगळ्यांना खूप मदत करायची. आपल्याला झाड बनवावे यासाठी जुई आणि चिनार भैरू जादूगाराला भेटले.<br>भैरू जादूगर या विचित्र मागणीने चक्रावला. भैरू जादूगाराने जुई आणि चिनारची समजूत घालण्याचा खूप प्रयत्न केला. पण चिनार, जुई आपल्या म्हणण्यावरून हटले नाही. शेवटी जादूगाराला कबूल करावे लागले. भैरू जादूगाराने चिनार आणि जुईला संमोहित केले. चिनार चिंचेचे झाड आणि जुई चाफ्याचे झाड झाली होती. पण झाड झाल्यावर त्यांना बोलता येत नव्हते, हलता येत नव्हते. शेवटी ज्याला जे अवयव मिळालेत त्यांनी त्यांचा उपयोग करून शक्य तितकी मदत एकमेकांना करावी हे चिनार आणि जुईला पटले. झाडे खोड, पानं, फुलं, फळं, मुळं या अवयवांचा उपयोग करून मदत करतात. तसेच आपण हात, पाय, डोळे, बुद्धी, मन यांचा उपयोग करून जमेल ती मदत करायला हवी, असे चिनार आणि जुई यांच्या बालमनाला पटले. | 8 |

| | | |
|---|---|---|
| उ.**6.** | **अ) खालीलपैकी कोणतेही एक वाक्य लेखननियमानुसार लिहा.** | |
| 1) | **मास्तरही** माझ्या **उत्तराची** अपेक्षा करत नसत. | **2** |
| 2) | माणसाचे **आयुष्य** केवळ **क्षणभंगुर** आहे. | **2** |
| | | |
| उ.**6.** | **आ) खालीलपैकी कोणत्याही दोन सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.** | |
| 1) | जिजालक्ष्मी - जिजा आणि लक्ष्मी - इतरेतर द्‌वंद्‌व समास | **1** |
| 2) | सप्ताह - सात दिवसांचा सप्ताह - द्‌विगू समास | **1** |
| 3) | भाजीपाला - भाजी, पाला वगैरे - समाहार द्‌वंद्‌व समास | **1** |
| 4) | न्यायान्याय - न्याय किंवा अन्याय - वैकल्पिक द्‌वंद्‌व समास | **1** |
| | | |
| उ.**6.** | **इ) कंसातील सूचनेनुसार बदल करून वाक्ये लिहा. (कोणतेही दोन)** | |
| 1) | किती विषारी आहे हा साप ! | **1** |
| 2) | असे बसून चालणार नाही. | **1** |
| 3) | बरोबर काही न्यायचे आहे का ? | **1** |
| | | |
| उ.**6.** | **ई) कंसात दिलेल्या वाक्यप्रचारांचा योग्य वापर करून वाक्ये लिहा. (कोणतेही चार)** | |
| 1) | वनिताला इतरांना सहकार्य करण्याचा **सोस आहे**. | **1** |
| 2) | पावसाळा सुरू होणार म्हणून मुंग्यांनी खायच्या वस्तूंची **बेगमी केली**. | **1** |
| 3) | निसर्गाच्या सान्निध्यात मी **आनंदविभोर होतो**. | **1** |
| 4) | कोणाच्याही सणाचा आनंद **हिरावून घेणे** योग्य नव्हे. | **1** |
| 5) | मानवी जीवनातील सुख हे **क्षणभंगुर आहे**. | **1** |
| 6) | वृक्षतोड करून मानवाने निसर्गाचा **विध्वंस केला**. | **1** |
| | | |
| उ.**7.** | **अ) खालील उतारा वाचून त्यावर चार प्रश्न तयार करा.** | |
| 1) | निसर्गातील प्रत्येक दृश्य कसे आहे ? | **1** |
| 2) | गाईंची आचळं कशाने तुडुंब भरलेली असतात ? | **1** |
| 3) | झाडे-वेलींना कोण हिंदळवतात ? | **1** |
| 4) | मेघांच्या पटलावर कशाच्या छटा पसरलेल्या असतात ? | **1** |
| | | |
| उ.**7.** | **आ) खाली दिलेल्या मुद्यांवरून गोष्ट लिहा. योग्य शीर्षक देऊन तात्पर्य लिहा. (कोणतीही एक)** | |
| 1) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 67 - Q.27 | **4** |
| 2) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 63 - Q.21 | **4** |
| | | |
| उ.**7.** | **इ) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्र लिहा.** | |
| 1) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 93 - Q.08 | **4** |
| 2) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 87 - Q.02 | **4** |

| | | |
|---|---|---|
| | <u>किंवा</u> | |
| उ.**7.** | इ) खालील विषयावर वृत्तांत लिहा. | |
| | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No.105 - Q.13 | **4** |
| | <u>किंवा</u> | |
| उ.**7.** | इ) खालील विषयावर जाहिरात लेखन करा. | |
| | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 114 - Q.14 | **4** |
| उ.**8.** | खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> विषयावर दिलेल्या मुद्यांच्या आधारे १५० शब्दांपर्यंत निबंध लिहा. | |
| 1) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 29 - Q.26 | **10** |
| 2) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 45 - Q.41 | **10** |
| 3) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 17 - Q.15 | **10** |

❑❑❑❑❑